# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १७ सप्टेंबर, २०२०

**बातमी -१**

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या (बॅकलॉगसह) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अनुषंगाने विकल्प अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी आता पुन्हा दोन दिवस म्हणजे १९ सप्टेंबर, २०२० पर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे.

विद्यापीठाने एम.के.सी.एल. द्वारे विकसित DU Portal (विद्यापीठाच्या http://numj. digitaluniversity.ac या संकेतस्थळावर) विद्यार्थ्यांच्या ई-सुविधा अकांउट मध्ये विकल्प पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यापुर्वी १७ सप्टेंबर मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र विद्यार्थ्यांना येत असलेल्या तांत्रिक अडचणींचा विचार करता विद्यापीठाने पुन्हा १९ सप्टेंबर पर्यंत मुदत वाढवून दिली आहे.

विकल्प अर्ज भरून देणेसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या http://numj.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर जाऊन ई-सुविधा अकाऊंटमध्ये Willingness to Appear in Exam या Link ला Click करून विकल्प सादर करायचा आहे. सदर Willingness Form फक्त २०१९-२० मध्ये पदवी, पदविका आणि पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षात प्रविष्ठ असलेल्या किंवा अंतिम वर्ष उत्तीर्ण / अनुत्तीर्ण होऊन मागील सत्र / वर्षातील असलेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे आहे.

अध्यादेश ६७ नुसार Mercy संधी आणि अध्यादेश १७४ नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑक्टोबर, २०२० मध्ये होणार नसून त्यांना पुढील परीक्षेच्या वेळी संधी दिली जाणार आहे. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी उपरोक्त Willingness Form भरू नये. जर विद्यार्थ्यांनी चुकीने भरला असल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी. पाटील यांनी दिली आहे.

**बातमी -२**

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना आणि नंदुरबार जिल्ह्याच्या धडगाव येथील महाराज ज.प. वळवी कला, वाणिज्य व व्ही.के. कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ११ हजार बांबू रोपांची लागवड होणार असून त्यानिमित्ताने शनिवार दि. १९ सप्टेंबर रोजी राज्यपाल तथा कुलपती श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबीनारचे उद्घाटन होणार आहे.

आत्मनिर्भर भारत या संकल्पपुर्तीच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी मोठ्या स्तरावर बांबू रोपांची लागवड धडगाव भागात केली जाणार आहे. यावर विविध अंगाने चर्चा व्हावी यासाठी बांबू मिशन अंतर्गत रोपांची लागवड या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबीनार सेमिनार शनिवार पासून सुरु होत आहे. शनिवारी १०.१५ वाजता या वेबीनारचे उद्घाटन राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरू प्रा.पी.पी. पाटील, प्र-कुलगुरू प्रा. पी.पी. माहुलीकर, व्य.प. सदस्य दिलीप पाटील, रा.से.यो. चे राज्य कार्यअधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, विभागीय संचालक डी. कार्तीज्युन, प्रभारी कुलसचिव प्रा. बी.व्ही. पवार यांची उपस्थिती असेल.

उद्घाटनानंतर दक्षिण बांबू असोसिएशनचे माजी अध्यक्ष कामेश सलाम, निलम मंजूनाथ, डॉ. पुष्पाकुमारी यांची व्याख्याने होणार आहेत. दुपारच्या सत्रात बांबूपासून बनविलेल्या साहित्याचे प्रदर्शन दाखविण्यात येणार आहे. रविवारी बांबू रोपांची लागवड विविध संघटनांच्या सहकार्याने केली जाणार आहे. त्यानंतर या वेबीनारमध्ये सुनील देशपांडे,टी.एस. रेड्डी, योगेश शिंदे, राजशेखर पाटील, आर.डी. पाटील यांची व्याख्याने होतील. अशी माहिती रा.से.यो.चे संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे यांनी दिली. धडगाव येथील महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या सहकार्याने गेल्या दोन वर्षापासून बांबूपासून विविध वस्तू तयार करणाऱ्या कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आल्यात. बांबू रोपांची नर्सरी तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शनही केले जाते. असे प्राचार्य एच.एम. पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून जळगाव, धुळे, नंदूरबार या तीनही जिल्हयात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती

आपला विश्वासू,

**(डॉ. सुनील पाटील)**

जनसंपर्क अधिकारी